MHAH230007192024

नियमीत दिवाणी दावा क्रमांक २९०/२०२४

कविता गणेश झेंडे
विरुध्द
१. भारती सदाशिव खेडकर

## निशाणी क्र.३४ वरील आदेश

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] प्रतिवादी क्र. ४ यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्याची समन्स प्राप्त होऊन देखील ते सदर दाव्यात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फाचे आदेश पारीत झाले. प्रस्तुत दाव्यात आवश्यक असणारी कागदपत्रे व माहिती उपलब्ध न झाल्याने तसेच, संबंधित वकीलांशी वेळेत संपर्क न झाल्याने प्रतिवादींना विहीत कालावधीत दाव्याच्याकामी हजर राहता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने त्यामध्ये त्यांचे हक्क गुंतलेले आहेत. सदरचा एकतर्फा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी क्र. ४ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल.

[०३] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जावर म्हणणे सादर करत असे कथन केले की, अर्जातील कारण संयुक्तीक व योग्य नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतरचे मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. ४ हे सदर प्रकरणात

हजर न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द दिनांक ०५-०२-२०२६ रोजी निशाणी १ वर त्यांच्याविरुध्द एकतर्फाचे आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत दावा गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ यांच्याविरुध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. ४ यांचेविरुद्ध पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वर नमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**(१)** निशाणी क्रमांक ३४ वरील अर्ज रक्कम रुपये १००/- इतका खर्च वादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** प्रतिवादी क्र. ४ यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला एकतर्फा आदेश रद्द करुन तसेच लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत असुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

**(३)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ४ यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.03.09 17:53:59 +0530

(प्रविण वि. पाटील)

दिनांक:- ०९-०३-२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | २१-०२-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | २१-०२-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | २१-०२-२०२६ |